# ती

आहे ती एकवचनी
पडली आहे माझ्या पचनी
करते ती प्रयोग एकपात्री
देते साथ दिवस रात्री

'हंगामात' रंगछटा उधळते
वचलिलहरींत मोहरते, फुलते
ऋतुहिरवा संपताच ओशाळते
ऊनपावसातही साथ देते

एकटीदुकटी किंवा मेळ्यात हरवते
वेळप्रसंगी तिच्या विसर ही पाडते
कधीकधी डोक्यावर ही बसते
म्हणते करू नका चोचले नसते

आहे भित्री, हृदयास भिडते
वैतागली की आत्मघाती होते
तिचे माझे आहे अतूट नाते
सांगा ती आहे कोण ते ?

— एम. डी. लेले, वसई
१८ जानेवारी २००५